# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com
Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org
Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


**महत्वाचे**

क्रमांक विकाअ/शिक्षण/मिटींग/२०१६/3162

दिनांक :- 29 SEP 2016

प्रति,

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती.
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती.
शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती/यवतमाळ/खामगाव/वाशिम/मुर्तिजापुर.
शासकीय निवासी महीला तंत्रनिकेतन, यवतमाळ.
डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती/गितादेवी खंडेलवाल इन्स्टिटयुट ऑफ फॉर्मसी, अकोला.
विभागप्रमुख संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ, अमरावती (अभियांत्रिकी/एमबीए/एमसीए विभाग)

**विषय :- खाजगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्तीची योजनेबाबत.**

संदर्भ :-१. मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १५/अर्थस/ईबीसी/२०१६-१७/१०१ २१ सप्टेंबर २०१६.

२. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे शासन निर्णय क्रमांक :- टीईएम २०१५/प्र.क्र.२१९/तांशि ४ दि. ३१ मार्च २०१६.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा. उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९/९/२०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये शासकीय व अनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापिठातील विनाअनुदानित तत्वावर चालविल्या जाणा-या व्यावसायीक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी सदर योजना उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे संदर्भ २ चे शासन निर्णयामध्ये नमुद मुद्या क्रमांक १ नुसार लागु नसल्याचे नमुद असल्याचे कळविलेले आहे. त्यामुळे सबंधित विद्यार्थी, संस्था यांनी या योजनेसाठी अर्ज करु नये, असे आपणास सुचित करण्यात येत आहे. त्याप्रमाणे आपल्या स्तरावर कार्यवाही व्हावी (सुलभ संदर्भासाठी संचालनालयाचे संदर्भ १ चे पत्र जोडलेले आहे).

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

F:\Documents and Settings\Administrator\My Documents\all Manish letter 30 B.doc

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दुरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१ फॅक्स - २६९२१०२
तार-EDUTECH E-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in internet:- http://www.dte.org.in


परिपत्रक

क्रमांक: १५/अर्थसं/ईबीसी/२०१६-१७/ ९०९
दिनांक : 21 SEP 2016

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे , नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर

विषय: खाजगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्तीची योजनेबाबत

संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र. टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४, दि. ३१ मार्च, २०१६

उपरोक्त विषयाबाबत सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते कीं, सदरहू शासन निर्णयातील पात्रतेचा निकषामधील मुद्दा क्र.१ मध्ये सदर योजना ही खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतनासमवेत शासकीय व अनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठातील विनाअनुदानित तत्वावर चालविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांनाही लागू राहील असे नमुद केले आहे. मात्र दि. १९.०९.२०१६ रोजीच्या मा. उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई येथे सर्व सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्या उपस्थितीत बैठकीत वरील मुद्दा उपस्थित करण्यात आला. सदरहू योजनेबाबत ही योजना खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्था तसेच शासकीय, अशासकीय अनुदानित, शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर चालविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी लागू आहे असे स्पष्ट केले. तरी शासकीय / अशासकीय अनुदानित पदवी, पदविका, व पदव्युत्तर पदवी या संस्थेतील व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना सदर योजना लागु नसल्यामुळे संबधीत विद्यार्थी , संस्था यांनी या योजनेसाठी अर्ज करू नये. आपल्या अधिनस्त सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित संस्था प्रमूखांना आपल्या स्तरावरुन सुचित करण्यात यावे.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

5967 26/9/16